# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २२.३.२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.३०) इतिवृत्त**

बुधवार दिनांक २२ मार्च २००६ रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.काशीनाथ कोकाटे** यांचे अध्यक्षतेखाली ''मलिक अंबर स्थायी समिती सभागृह '' येथे दुपारी ४.३० वाजता ''वंदे मातरम्'' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

(०१) श्री. कावडे साहेबराव राणुबा
(०२) श्री. खान मुजेब मिर आलम खान
(०३) सौ. खंदारे वंदना प्रकाश
(०४) श्री. गवळी रविकांत काशीनाथ
(०५) सौ. जधव संगिता विठ्ठलराव
(०६) श्री. जेजूरकर संतोष सुधाकर
(०७) सौ. दलाल लता श्रीनिवास
(०८) श्री. दाभाडे मिलींद यशवंत
(०९) श्री. दिलीप नारायण गायकवाड
(१०) श्री. नासेर नहदी मोहंमद याहीया नहदी
(११) श्री. पांडे विनायक प्रभाकर
(१२) श्री. बारवाल गजनन रामकिशन
(१३) श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
(१४) श्री. विसपुते शशांक दामोधर
(१५) श्री. वैद्य रेणूकादास दत्तोपंत

**विषय क्र.२७९ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(३) व २०(४) अन्वये स्थायी समितीचे आठ सदस्य चिठ्ठ्या टाकुन (ड्रॉ पध्दतीने) निवृत्त करणे.

**संवाद :**

नगर सचिव : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(३) व २०(४) अन्वये स्थायी समितीचे आठ सदस्य चिठ्ठ्या टाकून (ड्रॉ पध्दतीने) निवृत्त करणे संबंधी.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(२) अन्वये महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकानंतर आपल्या पहिल्या सभेत आपल्या पालिका सदस्यांपैकी १६ सदस्यांची स्थायी समितीचे सदस्य म्हणुन नेमणुक केली पाहिजे

पोट कलम ३ अन्वये स्थायी समितीच्या १६ सदस्यांपैकी निम्मे सदस्य पुढील प्रत्येक वर्षी पोट कलम २ मध्ये उल्लेख केलेले महानगरपालिकेची पहिली सभा ज्या महिन्यात भरेल त्या महिन्या पहिल्या तारखेस दुपारी निवृत्त होतील. महानगरपालिकेची पहिली सभा दि.२९/४/२००५ रोजी संपन्न झाली होती. त्यामुळे दि.१.४.२००६ रोजी मध्यान्हानंतर निम्मे सदस्य निवृत्त होतील. मुंबई

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० चे पोट कलम (४) मधील तरतुदीप्रमाणे पोट कलम (२) अन्वये निवडणूक झाल्यानंतर १ वर्षाने पोट कलम (३) अन्वये कोणते सदस्य निवृत्त होतील, ते पोट कलम (३) मध्ये निम्ननिर्दिष्ट केलेल्या त्यांच्या निवृत्तीच्या तारखेपुर्वी मा.स्थायी समितीचे सभापती ठरवतील अशा वेळी व अशा रितीने चिठ्ठ्या टाकुन ठरविण्यात येईल आणि त्यानंतर पुढील वर्षी स्थायी समितीचे जे सदस्य आपल्या पदावर जस्तीत जस्त काळापर्यंत असतील ते निवृत्त होतील. १६ नावाच्या स्वतंत्र चिठ्ठ्या पेटीत टाकलेल्या आहेत व त्यातुन एक-एक चिठ्ठी काढुन अशा ज्या आठ चिठ्ठ्या ज्यांच्या नावाच्या निघतील ते सदस्य निवृत्त होतील. *आता स्थायी समितीच्या ८ सदस्य निवृत्त होण्यासाठी १६ सदस्यांच्या नांवाच्या स्वतंत्र चिठ्ठया मा.सभापती पेटीत टाकतील. चिठ्ठ्या टाकतांना त्या सर्वांना दाखविण्यात येतील व बंद पाकीटात टाकून बंद पेटीत त्या टाकण्यात येतील आणि सरमिसळ करून एक-एक अशा आठ नांवाच्या चिठ्ठ्या काढण्यात येतील. ज्यांचे नांवाची चिठ्ठी निघेल ते स.सदस्य निवृत्त होतील असे समजण्यात येईल.

(यावेळी नगर सचिव हे १६ स्वतंत्र नावे असलेल्या १६ चिठ्ठया मा.सभापती यांचेकडे देतात व मा.सभापती या चिठ्ठ्यांवरील नांवे वाचुन दाखवतात व नावाच्या चिठ्ठ्या सर्वांना दाखवतात.)

नगर सचिव : १६ सन्माननीय सदस्यांच्या नावाच्या चिठ्ठ्या करण्यात आलेल्या असून मा.सभापती यांनी नांवे वाचून दाखवली व नांवे असलेल्या चिठ्ठ्या सभागृहात दाखवल्या आहेत. याबद्दल कुणाचा काही आक्षेप असेल तर तसे सुचवावे.

यानंतर कुणाचाही आक्षेप सादर होत नाही. म्हणून मा. सभापती चिठ्ठ्या असलेल्या पाकीटांची गुंडाळी करून एकाच रंगाचे रबर बँड लावण्यात आल्याचे सभागृहास दाखवून देण्यात आले. यानंतर १६ चिठ्ठ्या असल्याबाबत एक एक मोजणी करून सर्वांसमक्ष पारदर्शक बरणीत टाकण्यात आल्या. बरणीत १६ चिठ्ठ्या टाकून बरणी बंद करून सर्वांना दाखविण्यात आले . चिठ्ठ्यांची सरमिसळ करण्यात आली व येथेपर्यंतच्या कार्यवाहीबद्दल कोणास काही आक्षेप वा सूचना असेल तर ती सभागृहात मांडावी अशी सूचना करण्यात आली. त्यावर कोणीही हरकत अथवा सूचना केली नाही. नंतर या पारदर्शक बरणीतील १६ चिठ्ठ्या दुसऱ्या एका कपडा लावलेल्या बंद बरणीत टाकून त्यास हलवून पुन्हा सरमिसळ करण्यात आली व मा. सभापती यांचेकडे दिले.

मा.सभापती : कुणाचा आक्षेप नसल्याने १६ नांवे असलेल्या स्वतंत्र चिठ्ठ्या बंद पेटीत टाकण्यात आलेल्या आहेत. आता ज्या आठ चिठ्ठ्या काढण्यात येतील ते आठ सदस्य स्थायी समिती सदस्य पदावरून निवृत्त होतील.

मा.सभापती यांनी बंद पेटीतून एक-एक अशा आठ स्वतंत्र नांवे असलेल्या चिठ्ठ्या काढल्या त्यावर खालील स.सदस्यांची नांवे होती.

मा.सभापती : स.सदस्यांची नावे वाचुन दाखवण्यात येत आहे ती अशी.

| | |
|---|---|
| १. | श्री. जेजूरकर संतोष सुधाकर |
| २. | श्री. कोकाटे काशीनाथ हरिभाऊ |
| ३. | श्री. बारवाल गजनन रामकिशन |
| ४. | श्री. नासेर नहदी मो. याहीया |

| | |
|---|---|
| ५. | सौ. वंदना प्रकाश खंदारे |
| ६. | श्री. शशांक दामोधर विसपुते |
| ७. | श्री. कंवरसिंग किसनसिंग बैनाडे |
| ८. | सौ. संगिता विठ्ठलराव जधव |

नगरसचिव : एकुण १६ सदस्यांच्या बंद पेटीत चिठ्ठ्या टाकुन त्यातुन मा.सभापती यांनी ८ स.सदस्यांच्या चिठ्ठ्या काढल्या त्यात खालील ८ स.सदस्यांची नांवे निघाली.

१. श्री. जेजुरकर संतोष सुधाकर
२. श्री. कोकाटे काशीनाथ हरिभाऊ
३. श्री. बारवाल गजनन रामकिशन
४. श्री. नासेर नहदी मो. याहीया
५. सौ. वंदना प्रकाश खंदारे
६. श्री. शशांक दामोधर विसपुते
७. श्री. कंवरसिंग किसनसिंग बैनाडे
८. सौ. संगिता विठ्ठलराव जधव

वरील ०८ सदस्य दिनांक ०१/०४/२००६ रोजी दुपारनंतर स्थायी समिती सदस्य पदावरून निवृत्त होत आहेत.

मा.सभापती :चिठ्ठ्या टाकुन व ड्रॉ पध्दतीने काढण्यात आलेल्या ०८ चिठ्ठ्याद्वारे स्थायी समिती सदस्य पदावरून ०८ स.सदस्य निवृत्त होत आहेत, त्यांची नांवे खालील प्रमाणे.

१. श्री. जेजुरकर संतोष सुधाकर
२. श्री. कोकाटे काशीनाथ हरिभाऊ
३. श्री. बारवाल गजनन रामकिशन
४. श्री. नासेर नहदी मो. याहीया
५. सौ. वंदना प्रकाश खंदारे
६. श्री. शशांक दामोधर विसपुते
७. श्री. कंवरसिंग किसनसिंग बैनाडे
८. सौ. संगिता विठ्ठलराव जधव

वरील ०८ सदस्य स्थायी समिती सदस्य पदावरून निवृत्त झाल्याचे मी घोषीत करतो. सद.सदस्यांनी मी सभापती झाल्यापासुन हे सभागृह चालवण्यासाठी चांगल्याप्रमाणे सहकार्य केले. तसेच अधिकारी/कर्मचारी यांचे सर्वांचे अभिनंदन करतो. तसेच उर्वरित ०८ सदस्य व येणारे नविन ०८ सदस्य हे सर्वजण हे सभागृह चालवण्यासाठी येणारे नवीन सभापती यांना चांगल्या प्रकारे सहकार्य करीतील, विकास कामे करण्यास मदत करतील अशी अपेक्षा बाळगतो.

**ठराव :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(३) व २०(४) अन्वये चिठ्ठ्या टाकुन सोडत पध्दतीने खालील प्रमाणे ०८ (आठ) स्थायी समिती सदस्य निवृत्त झाल्याने त्यांचे निवृत्तीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१. श्री. जेजुरकर संतोष सुधाकर
२. श्री. कोकाटे काशीनाथ हरिभाऊ
३. श्री. बारवाल गजनन रामकिशन
४. श्री. नासेर नहदी मो. याहीया
५. सौ. वंदना प्रकाश खंदारे
६. श्री. शशांक दामोधर विसपुते
७. श्री. कंवरसिंग किसनसिंग बैनाडे
८. सौ. संगिता विठ्ठलराव जधव

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२८० :**

म्हाडा व महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने झोपडपट्ट्यांमध्ये ‘एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी सुधार कार्यक्रम’(IHSDP)(वाल्मिक-आंबेडकर आवास योजना) राबविण्यात येते. अल्प उत्पन्न गटातील पात्र झोपडपट्टीवासीयांना रू.८०,०००/- चे पक्के घर अनुदान तत्वावर बांधून देण्यात येते. झोपडपट्ट्याचा टोटल स्टेशन सर्व्हे, सोशन इकॉनॉमी सर्व्हे करण्यासाठी एजन्सी नियुक्त करण्यात आल्या आहेत.

बहुतेक झोपडपट्ट्यांच्या वसाहती ह्या अस्ताव्यस्त वसलेल्या आहेत. त्यासाठी संपूर्ण वसाहतीचे सुनियोजन करून मनपाच्या विकास आराखड्यानुसार रेखांकन करून त्यामध्ये बाधीत होणाऱ्या गटारी, रस्ते, ड्रेनेजलाईन, पाणी पुरवठा लाईन या मुलभूत सोई सुविधा नव्याने द्याव्या लागणार आहेत. त्यांची अंदाजपत्रके तयार करणे.

उपरोक्त कामे जलदगतीने होण्यासाठी मा.आयुक्तांच्या सूचनेनुसार खाजगी एजन्सीकडून सर्व्हेक्षण व अंदाजपत्रके करण्यात येतील.

वरील कामापोटी सदर एजन्सीला अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ०.५०% मोबदला देण्यात येईल. सदर एजन्सी नेमणूकीचा अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करण्यात येईल. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

सौ. लता दलाल : कशा पध्दतीने हे घरकुल देण्यात येणार आहे? किती रक्कम होणार आहे? हा प्रस्ताव मोघम स्वरूपात आलेला आहे. सविस्तर खुलासा व्हावा. घोषीत झोपडपट्ट्या किती आहेत, हे काम मनपाचे अधिकारी करू शकणार असे वाटत नाही.

श्री.गजानन बारवाल : सर्व शहराचा सर्वे होणार आहे. दारिद्र्य रेषेखालील लोकांचे सर्वेक्षण करण्याचे काम देखील आपणाकडे आलेले आहे.

श्री.मिलींद दाभाडे : योजना राबवितांना टप्प्याटप्प्याने राबविण्यात येणार आहे किंवा एकाच वेळी कार्यान्वीत करण्यात येणार आहे याबाबत माहिती देण्यात यावी.

श्री.दिलीप गायकवाड : स.सदस्यांच्या म्हणण्यानुसार दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असेल तर नगरसेवकांच्या यादीप्रमाणे काम करावे.

श्री.साहेबराव कावडे : वाल्मीक आंबेडकर आवास योजने अंतर्गत चिकलठाणा भागात 92 घरे बांधली. त्यापैकी 52 घरात संडासाची सोय नव्हती. पाणी व संडास या दोन्ही सुविधा असाव्यात. एजन्सीमार्फत सर्व्हे करण्याची चर्चा बऱ्याच दिवसांपासून ऐकण्यात येते. मा.आयुक्तांनी बरेच प्रयत्न केले. सदर योजने अंतर्गत 200 फाईल्स पूर्ण करून दिलेल्या आहेत. एजन्सीकडून तातडीने चार-पाच महिन्यात पूर्ण सर्वेक्षण करून महानगरपालिकेला देण्यात यावे.

श्री.शशांक विसपुते : गरीबांसाठी ही अत्यंत चांगली योजना आहे. महानगरपालिकेचे नांव देखील होईल. सदर योजना पूर्ण करण्यासाठी कालमर्यादा असणे आवश्यक आहे. सदर प्रस्तावास मंजुरी देण्यात यावी.

श्री.मुजीब खान : सदर योजने अंतर्गत प्रत्येक वॉर्डात किती झोपडपट्ट्या आहेत, याची माहिती सभागृहासमोर आणावी. ज्या भागात जास्त अडचणी आहेत तेथे प्रथम ही योजना राबवावी. सदर योजनेसाठी किती तरतुद आहे? राज्य सरकार व केंद्र शासनाचे किती अर्थसाह्य आहे? शहरात किती घरे बांधून देणार, सध्या संबंधीत अधिकारी सभागृहात नाही. याबाबतची लेखी माहिती सर्व स.सदस्यांना देण्यात यावी.

मा. सभापती : सर्व सदस्यांच्या सूचना विचारात घेवून सदर योजने अंतर्गत महाराष्ट्र शासनाकडून अनुदान प्राप्त आहे का, खर्चाचे नियोजन कसे राहणार? 1-2 कोटी विकास कामासाठी खर्च येईल. अंदाजपत्रक तयार झाल्यानंतर टक्केवारी प्रमाणे मान्यता देण्यात येईल. महानगरपालिकेतर्फे सर्वेक्षणाचे प्राथमिक काम करणे गरजेचे आहे. लोक सहभागाशिवाय योजना कार्यान्वीत करता येणार नाही. लोकांची सहमती मिळाल्यानंतरच नियोजन करण्यात यावे. पुर्वी 45 हजार मिळत होते त्यात स्नानगृह, संडास व नळ जोडणीचा समावेश नव्हता. वाढीव रक्कमेस मान्यता दिली. सदर प्रस्तावास धोरण म्हणून मान्यता देण्यात येते.

श्री.साहेबराव कावडे : सदर योजनेच्या सर्वेक्षणासाठी पाच ते साडेपाच महिन्यांचा मर्यादीत कालावधी देणत यावा. मागील दोन वर्षापासून मी सतत मागणी करत आहे.

श्री.कंरसिंग बैनाडे : सर्वेक्षणासाठी कालावधी ठरवून द्यावा.

मा. सभापती : सर्वेक्षणासाठी दोन महिन्याचा कालावधी देण्यात येतो. नागरीकांचे संमतीपत्र आल्यानंतर सर्वेक्षणावर खर्च करावा. सदर योजनेत लोक सहभाग घेण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे म्हाडा व महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने झोपडपट्ट्यांमध्ये 'एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी सुधार कार्यक्रम'(IHSDP)(वाल्मिक-आंबेडकर आवास योजना) राबविण्यासाठी संपूर्ण वसाहतीचे सुनियोजन करून मनपाच्या विकास आराखड्यानुसार रेखांकन करून त्यामध्ये बाधीत होणाऱ्या गटारी, रस्ते, ड्रेनेजलाईन, पाणी पुरवठा लाईन या मुलभूत सोई सुविधा नव्याने देण्याकरीता त्यांची अंदाजपत्रके तयार इ. कामे जलदगतीने होण्यासाठी खाजगी एजन्सीकडून सर्व्हेक्षण करून अंदाजपत्रके तयार करून घेण्यास व या कामापोटी सदर एजन्सीला अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ०.५०% मोबदला देण्यास तसेच एजन्सी नेमणूकीचा अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२८१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वाहतुकनगर, जधववाडी येथील ३६.०० मीटर रूंद विकास योजना रस्त्याचे सर्व्हेक्षण करून सर्व्हेक्षणानुसार गार्ड बाऊंड्रीचे दगड बसविणेच्या कामासाठी दरपत्रके मागविली असता पुढील तुलनात्मक दरपत्रके प्राप्त झाली.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | दर |
|---|---|---|
| १ | खोत पाटील आणि असोसिएटस् | रू.६४,०००/- |
| २ | मे.नितीन पी.गिरीधारी | रू.७६,२००/- |
| ३ | मे.आर्च इमेजकन्स्ट्रक्शन | रू.७४,५००/- |

वरील प्राप्त दरपत्रकांपैकी सर्व्हेक्षणाचे कामासाठी मे.खोत पाटील आणि असोसिएटस् यांचा दर रू.६४,०००/-(रूपये चौसष्ट हजर मात्र) एवढा आहे व तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे प्राप्त दरपत्रकांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमीचे दरपत्रक मे.खोत पाटील आणि असोसिएटस् यांचे रू.६४,०००/- चे मान्यतेस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वाहतुकनगर, जधववाडी येथील ३६.०० मीटर रूंद विकास योजना रस्त्याचे सर्व्हेक्षण करून सर्व्हेक्षणानुसार गार्ड बाऊंड्रीचे दगड बसविणेच्या कामासाठी प्राप्त दरपत्रकांपैकी सर्वात कमी दराचे म्हणजेच रू.६४,०००/- चे मे.खोत पाटील आणि असोसिएटस् यांचे दरपत्रक स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२८२ :**

कार्यकारी अभियंता (जलनि:सारण, विद्युत,इमारती व उद्याने) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संत एकनाथ रंगमंदिर येथे विद्युत व्यवस्था, डिमर आणि ध्वनी व्यवस्था करणेच्या कामाकरीता अंदाजपत्रक रक्कम रू.४,६०,०००/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यतेनंतर निविदा सचूना क्र.१००/२००६ दि.१७.२.२००६ अन्वये वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली. निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत दोन कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या दिवशी दोन दर भरलेल्या सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | अं.प.दरापेक्षा |
|---|---|---|
| १ | मे.असन्सो लाईटस्, औरंगाबाद | २.५% कमी दराने |
| २ | मे.लुना इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद | २% कमी दराने |

उक्त प्रमाणे प्राप्त निविदांमध्ये तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.५% कमी दराची निविदा मे.असन्सो लाईटस्, औरंगाबाद यांची आहे. सदर प्राप्त दराच्या निविदेस मा.आयुक्तांनी शिफारस केलेली आहे.

तरी मे.असन्सो लाईटस् औरंगाबाद यांची २.५% कमी दराची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.गजानन बारवाल : संत एकनाथ रंगमंदिराची सद्य:स्थिती काय आहे.

श्री.कंवरसिंग बैनाडे : संत एकनाथ रंगमंदिर हे अद्ययावत व्हावे या संदर्भात दोन चार महिन्यापुर्वी मी प्रश्न विचारलेला होता. सदर रंगमंदिरावर किती खर्च झाला व किती उत्पन्न मिळाले? अद्याप माहिती मिळालेली नाही. बीओटी तत्वावर द्यावे. आपणास भुर्दंड पडतो. उत्पन्न कमी येते. त्यामुळे उत्पन्न किती व खर्च किती यासंबंधी माहिती देण्यात यावी.

श्री. मुजीब खान : संत एकनाथ रंगमंदिर च्या संदर्भात यापुर्वीही सभागृहात चर्चा झालेली आहे. या रंगमंदिरासाठी पार्कीगची व्यवस्था होण्याकरीता लगतचे भूखंड संपादीत करावयास पाहिजे. या संदर्भात निविदा निघालेल्या आहे किंवा नाही, पार्कीगच्या जागेचे पैसे दिलेले आहे का, लगत रस्त्याची जागा होती त्याचे काय झाले?

उप अभि.(विद्युत) : संत एकनाथ रंगमंदिर 1986 ला परिपूर्ण होऊन कार्यरत झालेले आहे. अस्तित्वातील प्रकाश व ध्वनी व्यवस्था तेव्हापासूनची आहे. त्यास सुमारे 20 वर्ष झाले. वारंवार देखभाल दुरूस्तीची कामे करावी लागतात. सद्य:स्थितीत सुमारे 1000 आसनक्षमता आहे. नाट्य व संस्कृती, कला इत्यादी कार्यक्रमासाठी याचा वापर होतो.

श्री. मुजीब खान : यापुर्वी 12-14 लाख खर्च केले होते. पुर्वी कोणते देखभाल दुरूस्तीचे काम केले त्याचा खुलासा व्हावा. एकमेकांवर चालढकल करतात. एकही खरी माहिती सभागृहात दिली जात नाही.

कार्य.अभि.(वि.ड्रे.इ.उ.) : मागील स्थायी समिती बैठकीच्या पुर्वी देखभाल दुरूस्तीसाठी अंदाजपत्रक मंजुरीसाठी सादर करण्यात आले होते. निविदा काढण्यात आलेल्या आहेत. आज निविदा मंजुरीचा प्रस्ताव सभागृहात सादर करण्यात आलेला आहे.

सौ. लता दलाल : संत एकनाथ रंगमंदिर 1986 ला कार्यान्वीत करण्यात आले. दरवर्षी आपण किती अर्थसंकल्पीय तरतुद ठेवतो. वर्तमानपत्रातून नेहमी बातम्या प्रसिध्द होतात, संत एकनाथ रंगमंदिराची अत्यंत वाईट अवस्था आहे. या वास्तुवर 20 वर्षात किती खर्च केला. सदुपयोग होतो का? चालू आर्थिक वर्षात किती खर्च झालेला आहे. कुलींग, ध्वनीक्षेपण, आसन व्यवस्था याची परिस्थिती काय आहे?

श्री. संतोष जेजुरकर : आजपर्यंत जेवढे कार्यक्रम होतात त्यासाठी प्रयोग करणारे स्वतः ध्वनी/प्रकाश व्यवस्था करतात. मग आपण का खर्च करतो? प्रती लाईट/डीमर यासाठी आपण 1000-2000 खर्च करणार आहोत का?

मा. सभापती : सदर प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. 20 वर्षात संत एकनाथ रंगमंदिरावर झालेल्या खर्चाचा संपूर्ण अहवाल देण्यात यावा. त्याचप्रमाणे किती कार्यक्रम झाले व त्यापासून किती उत्पन्न मिळाले ते टिप्पणीच्या स्वरूपात देण्यात यावे. पावसाळ्यात कार्यक्रम कमी असतात. दुरूस्तीची कामे पावसाळ्यात सुरू करावीत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संत एकनाथ रंगमंदिर येथे विद्युत व्यवस्था, डिमर आणि ध्वनी व्यवस्था करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दराची व अं.प.दरापेक्षा २.५% कमी दराची मे.असंन्सो लाईटस्, औरंगाबाद यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२८३ :**

कार्यकारी अभियंता (जलनि:सारण, विद्युत,इमारती व उद्याने) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संत एकनाथ रंगमंदिर येथे नवीन एअर कुलींग सिस्टीम बसविणेच्या कामाकरीता अंदाजपत्रक र.रू.११,०२,८८०/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यतेनंतर निविदा सूचना क्र.१००/२००६ दि.१७.२.२००६ अन्वये वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली. निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत तीन कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या दिवशी तीन दर भरलेल्या सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | अं.प.दरापेक्षा |
|---|---|---|
| १ | मे.लुना इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद | ३.३% कमी दराने |
| २ | मे.असन्सो लाईटस्, औरंगाबाद | ४.८% जस्त दराने |
| ३ | मे.कॉनव्हेक इंजिनिअरींग कंपनी,तलोज, रायगड | ५.८% जस्त दराने |

उक्त प्रमाणे प्राप्त निविदांमध्ये तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.३% कमी दराची निविदा मे.लुना इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांची आहे. सदर प्राप्त निविदा मान्यतेस्तव स्थायी समितीसमोर ठेवण्यासाठी मा.आयुक्तांनी शिफारस केलेली आहे.

तरी मे.लुना इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांची ३.३% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव मंजुरीच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संत एकनाथ रंगमंदिर येथे नवीन एअर कुलींग सिस्टीम बसविणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दराची व अं.प.दरापेक्षा ३.३% कमी दराची मे.लुना इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२८४ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या बळकटीकरणाकरीता वर्ष २००४-०५ मधील आर्थिक तरतूदीमधून ७१४.०० लक्ष रक्कमेची कामे प्रस्तावित करण्यात आली होती. या कामांतर्गत मुख्य जलवाहिनीवर ड्रम टाईप एअर व्हॉल्व बसविणेचे रूपये २२.८४ लक्ष किंमतीचे कामाचा समावेश करण्यात आला होता व त्या अनुषंगाने निविदा स्विकृत करण्यात येऊन साहित्याचा पुरवठा करण्यात आला आहे.

ड्रम टाईप एअर व्हॉल्व प्रायोगिक तत्वावर बसविण्याच्या प्रयत्ना अंतर्गत ड्रम हा पाईप लाईनला धोकादायक बनण्याची शक्यता निदर्शनास आल्यामुळे सदरचा प्रस्ताव तांत्रिक सल्लागार यांच्या सल्ल्यानुसार रद्द करण्याचे मान्य करण्यात आले आहे. योजनेच्या दैनंदिन देखभाल दुरूस्ती करीता ७०० व १४०० मी.मी.व्यासाच्या पाईपांची उपलब्धता असणे गरजेचे आहे. याकरीता स्वतंत्र तरतूद करणे गरजेचे आहे. तथापी रूपये २२.८४ लक्ष रक्कमेच्या कामा अंतर्गत ड्रम टाईप एअर व्हॉल्व बसविण्याचे काम रद्द केल्यामुळे होणाऱ्या रू.१३.८४ लक्ष बचतीमधून हे पाईप अतिरिक्त बाब म्हणुन याच निविदे अंतर्गत चालू दरसूचीनुसार घेतल्यास पाईप पुरवठ्याकरीता स्वतंत्र तरतूद करावी लागणार नाही. त्यामुळे या तरतूदीमधून योजनेवर देखभाल दुरूस्तीकरीता आवश्यक असलेल्या एम.एस.पाईपचा पुरवठा अतिरिक्त बाब म्हणुन घेण्यात यावा असा प्रस्तावमा.आयुक्तांनी मा.स्थायी समितीसमोर विचारार्थ सादर करणेची शिफारस केलेली आहे.

रक्कम रूपये २२.८४ लक्ष किंमतीच्या मंजूर निविदा ही ७.५०% जस्त दराची मंजूर असून त्यानुसार या कामामधून ९,६८,०००/- इतका खर्च होणार आहे. उर्वरीत रक्कम रूपये २२.८४ - ९.६८ = रू.१३.१६ लक्ष रक्कमेच्या बचतीमधून ७०० व १४०० मी.मी.व्यासाचे एम.एस.पाईप खरेदी करण्याची अतिरिक्त बाब म्हणून चालू दरसूचीनुसार अंदाजपत्रकीय दराने स्विकृत निविदा धारकाकडून करून घेण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या बळकटीकरणाचे कामांतर्गत मुख्य जलवाहिनीवर ड्रम टाईप एअर व्हॉल्व बसविणेचे रूपये २२.८४ लक्ष किंमतीचे कामातून मुख्य जलवाहिनीवर ड्रम टाईप एअर व्हॉल्व बसविण्याचे काम रद्द केल्याने १३.१६ लक्ष रक्कमेच्या होणाऱ्या बचतीमधून ७०० व १४०० मी.मी.व्यासाचे एम.एस.पाईप खरेदी करण्याची अतिरिक्त बाब म्हणून चालू दरसूचीनुसार अंदाजपत्रकीय दराने स्विकृत निविदा धारकाकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२८५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे शहरातील मुख्य रस्त्यावर व वार्डातील मुख्य रस्त्यावर जे पथदिवे लावण्यात आले आहेत त्याची देखभाल दुरूस्ती महानगरपालिकेच्या फंडातून होते. या कामी दैनंदिन दुरूस्ती करणे, विद्युत देयकाचा भरणा करणे असा खर्च महानगरपालिकेस करावा लागतो. तसेच बऱ्याच वेळा तरतूदी अभावी देखभाल दुरूस्तीची कामे करता येत नाही.

वरील सर्व बाबी लक्षात घेता महानगरपालिकेतर्फे सर्व पथदिवे चालू राहतील व त्यांची देखभाल दुरूस्ती सुध्दा व्यवस्थीत व्हावी या दृष्टीने कोल्हापूर महानगरपालिकेच्या धर्तीवर बी.ओ.टी. तत्वावर औरंगाबाद शहरातील अस्तित्वातील पथदिव्यांच्या जगी Energy Saving (पांढरा प्रकाश देणारे दिवे) दिवे लावणे बाबत संकल्पना आहे. यात अनेक कंपन्या बी.ओ.टी.तत्वार Energy Saving पथदिवे लावून वीज बिलात बचत करून व वीज बिलातील बचतीतून त्यांचा खर्च काढून घेऊन काही प्रमाणात महानगरपालिकेला रक्कम देण्यास तयार आहेत. यामध्ये होणाऱ्या वीज बचतीमुळे महाराष्ट्र राज्य वीज

वितरण कंपनीच्या वीजबिलात जे बचत होईल त्या बचतीतून दिलेल्या अटींवर कंत्राटदार/कंपनी हे दिवे लावतील व वीजबिलात होणाऱ्या बचतीतून हे त्यांचा खर्च परस्पर काढून घेतील. या बाबत सविस्तर प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेत सादर करण्यात आला व त्यास विषय क्र.१२८/५ दि.१९.१२.२००५ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे. या कामांतर्गत खालील अटी/शर्तीस अधीन राहून बी.ओ.टी. तत्वावर Energy Saving दिवे लावणसाठी जहिर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली.

१. Energy Saving Contract अंतर्गत सर्व स्ट्रीट लाईट फिक्चर्स बदलून त्या ठिकाणी कंपनीचे Energy Saving Contract फिक्चर्स लावणे.
२. रात्रभर Uniform Light राहील याची दक्षता घेणे.
३. पॉवर फॅक्टर योग्य राहील (०.९५) पेक्षा कमी असणार नाही याची दक्षता घेणे.
४. सर्व लाईट उत्कृष्ट प्रतिचे राहील, जेणे करून नागरीकांना त्रास होणार नाही.
५. जर फिक्चर्स दुरूस्त करणे झाल्यास संपूर्ण Contract Period मध्ये बदलून तसेच दुरूस्त करून देण्यात येईल.
६. कमीत-कमी ९५% लाईट पथदिवे नेहमी चालू राहील याची दक्षता घेणे.
७. २४ तास तक्रार निवारण कक्ष कंपनीतर्फे चालविण्यात यावे.
८. ४८ तासाच्या आत तक्रार निवारण करण्यात यावे.
९. वीजबचतीसाठी Baseline ही सर्व पथदिवे चालू राहतील अशी असावी.
१०. सदर करार हा सात वर्षासाठी राहील.
११. उक्त सर्व बाबींची पुर्तता करून वीज बीलात कमीत-कमी ४०% बचत करणेची जबाबदारी ठेकेदाराची/ कंपनीची राहील.
१२. कंपनीच्या पथदिव्याची Lux level गुणवत्ता व दर्जा तपासण्यासाठी प्रायोगीक तत्वावर मुख्य रस्त्यावरील २५ खांबांवर कंत्राटदार/ कंपनीस Energy saving दिवे लावण्याची परवानगी देण्यात येईल. या कामाच्या खर्चाचा समावेश एडउज पध्दतीने करावयाच्या कामात करण्यात येईल. या दिव्यांची प्रकाशाची प्रत (Light/illumination quality) व वीजबिलात होणारी बचत तपासली जाईल. होणारी बचत ४०% पर्यंत असल्यास समाधानकारक गृहीत धरली जाईल व तद्नंतर शहरातील सर्व ठिकाणचे पथदिवे बदलण्याचे काम कंत्राटदार/ कंपनीस टप्प्या-टप्प्याने देण्यात येईल.

या कामाच्या निविदा सूचना क्र.७७/२००५ दि.२८.१२.२००५ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता, कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण चार निविदा विक्री झाल्या व दर भरलेल्या निविदा स्विकृतीच्या दिवशी खालील प्रमाणे चार निविदा प्राप्त झाल्या.

१. मे.एशियन इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड, पुणे.
२. मे.विनवॉक सिस्टीम्स् (Win Walk Systems INC), नाशिक.
3. मे. सोनू इलेक्ट्रीकल्स, नागपूर
४. मे. उमा उद्योग, लातूर.

निविदेतील पात्रतेबाबतच्या कागदपत्रांची तपासणी केली असता मे.उमा उद्योग, लातूर यांचेकडे विद्युत लायसन्स सर्टिफिकेट नसल्याने व आय.एस.१०३२२ चे प्रमाणपत्र नसल्याने तसेच मे.एशियन इलेक्ट्रॉनिक्स, पुणे यांचे विद्युत लायसन्स सर्टिफिकेट सन २००६ साठी नुतनीकरण कलेले नसल्याने त्यांच्या निविदा उघडण्यात आल्या नाही.

उर्वरीत मे.सोनू इलेक्ट्रीकल्स, नागपूर व मे. विनवॉक सिस्टीम्स, नाशिक यांच्या निविदा उघडण्यात आल्या असून त्यांचे प्राप्त दर खालील प्रमाणे आहेत.

१. मे. विनवॉक सिस्टीम्स, नाशिक

❖ विजबचतीच्या रक्कमेच्या २३% हिस्सा महानगरपालिकेस देणार व

❖ विजबचतीच्या रक्कमेच्या ७७% हिस्सा वत: ठेऊन घेणार.

२. मे.सोनू इलेक्ट्रीकल्स, नागपूर

❖ १००% विजबचत स्वत:कडे ठेवून घेणार तसेच होणाऱ्या वीजबचतीचा १०% हिस्साही महानगरपालिकेकडून घेणार.

उक्त प्रमाणे प्राप्त दोन्ही दरांचा तुलनात्मक अभ्यास केला असता, मे. विनवॉक सिस्टीम्स, नाशिक यांचे दर महानगरपालिकेच्या आर्थिक फायद्याचे म्हणजेच ते विज बचतीच्या रक्कमेच्या २३% हिस्सा महानगरपालिकेस देणार व विज बचतीच्या रक्कमेच्या ७७% हिस्सा स्वत: ठेवून घेणार असे आहेत.

उक्त प्रमाणे बी.ओ.टी. तत्वावर Energy Saving दिवे लावण्याच्या मे.विनवॉक सिस्टीम्स, नाशिक यांच्या प्राप्त दराची निविदा मा.स्थायी समिती सभेसमोर सादर करण्याची शिफारस मा.आयुक्तांनी केलेली आहे.

तरी मे.विनवॉक सिस्टीम्स, नाशिक यांची होणाऱ्या वीजबचतीतून महानगरपालिकेस जस्त बचत देणारी म्हणजेच विज बचतीच्या रक्कमेच्या २३% हिस्सा महानगरपालिकेस देणार व विज बचतीच्या रक्कमेच्या ७७% हिस्सा स्वत: ठेऊन घेणार या दराची निविदा मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.रेणुकादास वैद्य : वीज बचत किती होईल? व वीज बचतीच्या 23% म्हणजे किती? हे सात वर्षासाठीच का, एक वर्षासाठी का नाही?

श्री.विनायक पांडे : एकूण किती वीजबील बचत होणार आहे.

श्री. मुजीब खान : मनपाचे असे एकूण किती विद्युत मीटर आहेत की आपण वापर करत नाही मात्र बील भरतो. उदा.सिटीचौक पोलीस स्टेशन, बीबीका मकबरा, मोंढा इ. बाबत चौकशी अहवाल देण्यात येणार होता. आजपर्यंत प्राप्त नाही. अतिरिक्त किती बील येते व मीटर किती आहेत? अनेक विहिरींवर पाणी पुरवठ्यासाठी विद्युत पंप बसविण्यात आले. पावसाळ्यातही विद्युत पंप तेथेच आहेत व त्याचे बील मात्र आपण भरत आहोत. किती बील भरण्यात येते त्याची माहिती देण्यात यावी.

श्री.शशांक विसपुते : वीज बचतीचा प्रस्ताव आहे, यासाठी महानगरपालिकेस खर्च करावा लागणार नाही. जे पथदिवे बदलण्यात येतील त्यांचा काय वापर होणार.

श्री.गजानन बारवाल : निश्चितपणे बचत व्हावी. वीजबीलात 40% बचत करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहिल याचा अर्थ आज 40% तोटा होतो का? या संदर्भात आपण काही उपाययोजना केली नाही का? कामाच्या हमीबद्दल काय याचा बोध होत नाही. देखभाल दुरूस्ती कशा पध्दतीने करण्यात येईल? जे साहित्य निघणार आहे त्याचे काय करणार, बचत कशी होईल याबद्दल माहिती देण्यात यावी.

कार्य.अभि. .(वि.ड्रे.इ.उ.): 5000 पथदिवे लावण्यात येणार आहेत.

श्री. साहेबराव कावडे : 5000 पथदिवे कसे लावणार? संपूर्ण वॉर्डात असेल तर मंजूर करावे. माझ्या वार्डात दोन वर्षापासून पथदिवे लावण्यात आले नाही. प्रस्तावात दुरूस्ती करावी. पूर्ण वॉर्डांचा समावेश करावा, एकही वॉर्ड सुटू नये.

श्री.गजानन बारवाल : सर्व शहरासाठी आहे.

सौ. लता दलाल : स.सदस्य श्री.कावडे मामा जे बोलतात ते बरोबर आहे. प्रत्येक वॉर्ड कार्यालय निहाय नियोजन करण्यात यावे. संपूर्ण शहरात 5000 दिवे कोणकोणत्या भागात कसे लावणार?

कार्य.अभि. .(वि.ड्रे.इ.उ.): सर्वसाधारण सभेमध्ये संपूर्ण शहरासाठी प्रस्ताव ठेवला होता. सर्वसाधारण सभेने 5000 पथदिव्यांसाठी प्रायोगिक तत्वावर करण्याचा निर्णय घेतलेला आहे. यशस्वी झाल्यास संपूर्ण शहरासाठी विचार करण्यात येईल.

मा. सभापती : विद्युत बचतीचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेमध्ये ठेवण्यात आला होता. हा प्रस्ताव सर्व शहरासाठी होता परंतु ही योजना यशस्वी झाली नसती तर विद्युत व्यवस्थेची सर्व यंत्रणा कोलमडली असती. सर्वसाधारण सभेने प्रथम 5000 दिव्यांसाठी बीओटीस मान्यता दिली. स.सदस्यांच्या सूचना चांगल्या आहेत. 23% नेमकी बचत कशावर आहे? आपणांस बचतीवर पैसे मिळणार आहेत. देखभाल दुरूस्ती व उपकरणांचा खर्च सर्व ठेकेदाराने करावयाचा आहे. एक वर्षासाठी त्यांना परवडणार नाही. सदर एजन्सीने ही योजना चांगल्या प्रकारे राबवली तर संपूर्ण शहरासाठी त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.

श्री.साहेबराव कावडे : प्रस्तावास विरोध नाही. पूर्ण वार्डात करा, माझा वॉर्ड पूर्ण घ्यावा.

मा. सभापती : कार्यकारी अभियंता (विद्युत) यांना सूचना देण्यात येते की, आज झालेल्या चर्चेचा व सूचनांचा संदर्भ देऊन चिकलठाणा येथील पथदिव्यांचे बी.ओ.टी. तत्वावरचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा.

सौ.लता दलाल : दोन अटींचे पालन करण्यात यावे. पावर फक्टर 0.95 पेक्षा कमी राहणार नाही याची दक्षता घ्यावी. बीलात बचत होईल. शहराचा अर्धा भाग अंधारात राहू नये. 95% पथदिवे नेहमी चालू राहतील याची दक्षता घ्यावी. या बाबींची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

श्री. गजानन बारवाल : काही तरी बँक गॅरंटी घ्यावी.

कार्य.अभि.(वि.ड्रे.इ.उ.) : संपूर्ण नवीन दिवे लावण्यात येणार आहेत व त्यासाठी आपण त्यांना परवानगी देणार आहोत. वीजबीलाच्या बचतीचा 23% वाटा आपणांस मिळणार आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेतर्फे सर्व पथदिवे चालू राहतील व त्यांची देखभाल दुरूस्ती सुध्दा व्यवस्थीत व्हावी या दृष्टीने कोल्हापूर महानगरपालिकेच्या धर्तीवर बी.ओ.टी. तत्वावर औरंगाबाद शहरातील अस्तित्वातील पथदिव्यांच्या जगी Energy Saving (पांढरा प्रकाश देणारे दिवे) दिवे लावणे करीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या महानगरपालिकेच्या आर्थिक फायद्याची असलेली मे.विनवॉक सिस्टीम्स, नाशिक यांची होणाऱ्या वीज बचतीतून महानगरपालिकेस जस्त बचत देणारी म्हणजेच विज बचतीच्या रक्कमेच्या २३% हिस्सा महानगरपालिकेस देणार व विज बचतीच्या रक्कमेच्या ७७% हिस्सा स्वत: ठेऊन घेणार या दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रायोगीक तत्वावर राबविण्यात येणारी योजना यशस्वी झाल्यास विस्तृत प्रमाणात शहरातील इतर भागात राबविण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२८६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, औरंगाबाद शहरात महानगरपालिकेकडून रस्ते डांबरीकरण, खडी रस्ते, इमारती बांधकाम इत्यादी विकासाची कामे करण्यात येतात. सदर कामे करीत असतांना कामाचा दर्ज व गुणवत्ता मानकाप्रमाणे ठेवण्यासाठी ज्या कामाचे अंदाजपत्रक रू.५.०० लक्ष रक्कमेपेक्षा जस्त आहे, अशा सर्व कामाचे Third Party Inspection द्वारे तपासणी करण्यासाठी, मॅनेजर, S.G.S.India Private Limited, Pune यांच्याशी संपर्क करण्यात आलेला असून त्यांनी Third Party Inspection करण्यासाठी वाटाघाटी अंती खालील प्रमाणे तपासणी शुल्क कळविलेले आहे.

**तपासणी शुल्क (Inspection Charges):-**

(A) 0.70% of the Work order Value Subject to minium of Rs.4500 per man day.

(B) Quality Assurance Plan - Rs.10,000/- per QAP.

तरी उपरोक्त प्रमाणे Manager, S.G.S.India Private Limited, Pune यांची सन २००५-२००६ व २००६-२००७ या कालावधीसाठी महानगरपालिकेतील कामांचे Third Party Inspection करण्याकरीता उपरोक्त प्रमाणे नेमणूक करण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

<u>ठराव :</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरात महानगरपालिकेकडून रस्ते डांबरीकरण, खडी रस्ते, इमारती बांधकाम इत्यादी विकासाची कामे करीत असतांना कामाचा दर्ज व गुणवत्ता मानकाप्रमाणे ठेवण्यासाठी ज्या कामाचे अंदाजपत्रक रू.५.०० लक्ष रक्कमेपेक्षा जस्त आहे, अशा सर्व कामाचे Third Party Inspection द्वारे तपासणी करण्यासाठी प्रस्तावात दर्शविलेल्या तपासणी शुल्क (Inspection Charges) च्या अधीन राहून Manager, S.G.S.India Private Limited, Pune यांची सन २००५-२००६ व २००६-२००७ या कालावधीसाठी Third Party Inspection करण्याकरीता नेमणूक करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

‘ राष्ट्रगितानंतर’ सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद